॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३० ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरु असलेल्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०२६' आणि दिव्यांग कला महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला प्रकारातून भारतीय सांस्कृतीक आणि परंपरेचे दर्शन घडविले. युवक महोत्सवात भारतीय लोक समूह नृत्य, भारतीय नाट्य संगीत – एकल, भारतीय सुगमसंगीत, एकांकिका, वादविवाद स्पर्धा, पोस्टर मेकींग, रांगोळी, स्थळ छायाचित्र (अंतीम फेरी), इन्स्टालेशन, मेहंदी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने कौशल्याचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. दरम्यान उद्या दि.३१ रोजी सकाळी १० वाजता पारितोषिक वितरण आणि समारोप समारंभ होणार आहे.

रंगमंच क्र. १ महात्मा फुले सभागृहात भारतीय लोक समूह स्पर्धेत विविध प्रातांतील लोकसंस्कृतीचे दर्शन घडवून प्रभावीपणे सादरीकरण केले. गरबा,वाघ्या मुरळी, पावरा नृत्य, आदिवासी नृत्य, तामिळनाळू राज्यातील करगट्टम नृत्य, राजस्थानमधील कालबेलीया नृत्य, आसाममधील बिहूनृत्य, मध्यप्रदेश राज्यातील सेंला नृत्य , बरेदी नृत्य, बंजारा नृत्य यावर सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेत १७ संघ सहभागी होते.

रंगमंच क्र. २ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात भारतीय सुगमसंगीत या प्रकारात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भावगीत आणि भक्तीगीतांवर उपस्थित तल्लीन झाले. ये सावळ्या घना,सांज ये गोकुळी,बाजे मुरली या बाजे,घेता नाम विठूबाचे भक्तीगीत तर गाण्यात सर्व माझ्या हे भावगीत सादर केले. मर्म बंधातली ठेव ही,हे सुरांनो चंद्र व्हा, घेई छंद मकरंद,वध जावू कुणाला शरण या नाट्यगीतांचे सादरीकरण झाले. भारतीय सुगमसंगीत ,भारतीय नाट्यसंगीत या स्पर्धेत या स्पर्धेत २९ संघांनी सादरीकरण केले.

रंगमंच क्र. ३ शाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात आयोजित एकांकिका स्पर्धेत सामाजिक,सांस्कृतीक आणि मानवी जीवनाशी संबधीत विषयावर सादरीकरण करुन उपस्थितांची दाद मिळवली. या स्पर्धेत ५ संघांनी सहभाग नोंदविला.
रंगमंच क्र. ४ संत रविदास सभागृहात वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मुद्देसुद मांडणी करत प्रतिस्पर्धकांच्या मतांचे अचूकपणे खंडण करण्याचे कौशल्य दिसून आले.

रंगमंच क्र. ५ संत गाडगेबाबा सभागृहात पोस्टर मेकींग, रांगोळी, स्थळ छायाचित्र (अंतीम फेरी), इन्स्टालेशन, मेहंदी या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा कल्पकतेचे पलू अधोरेखित झाले. पोस्टर मेकींग कला स्पर्धेत ४१ विद्यार्थी सहभागी होते त्यांना विषय जल हा जो कल हा व्यसनाधिनता, विकसीत भारत , रांगोळी स्पर्धेत ६३विद्यार्थ्यांनी सहभागी होते. स्थळ छायाचित्र स्पर्धेत १० विद्यार्थ्यांनी, जल, जमीन आणि जंगल हे विषय होते, इन्स्टालेशन या स्पर्धेत ५० विद्यार्थ्यांनी तर मेहंदी स्पर्धेत ८२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मोबाईल मध्ये हरवलेले बालपण, स्त्री सक्षमीकरण, वृध्दाश्रम आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

युवारंग २०२६ मध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले हक्काचे व्यासपीठ!

घरासारखी आपुलकी, विशेष सुविधा आणि सादरीकरणात प्रथम प्राधान्य; दिव्यांग विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाच्या उपक्रमाचे कौतुक

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरू असलेल्या आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०२६' अंतर्गत आयोजित दिव्यांग कला महोत्सवाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा, त्यांना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि त्यांच्यातील आत्मविश्वासाला बळ मिळावे, या उद्देशाने या विशेष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकार सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.

या दिव्यांग कला महोत्सवात एकूण १० महाविद्यालयांतील १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विविध कलाप्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने आपली कला सादर केली. यामध्ये भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत (स्वरवाद्य) एक विद्यार्थी, भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत (तालवाद्य) दोन, भारतीय शास्त्रीय गायन (एकल) तीन, भारतीय सुगम संगीत दोन, वक्तृत्व सहा, स्थळचित्र तीन, व्यंगचित्र तीन आणि मातीकला या प्रकारात चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. संगीत, वक्तृत्व, चित्रकला आणि हस्तकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कलात्मक क्षमतेचे प्रभावी दर्शन घडविले.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष नियोजन

युवारंग २०२६ च्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठाने विविध समित्यांची स्थापना केली असून, दिव्यांग विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांचा विचार करून आयोजन समितीतील प्रत्येक सदस्य आपापली जबाबदारी पार पाडत आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना कार्यक्रमस्थळापर्यंत ये-जा करण्यासाठी विद्यापीठातर्फे विशेष वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेल्या कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यासाठी त्यांना प्रथम प्राधान्य दिले जात आहे.

प्रत्येक सभागृहात सादरीकरणासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून, भोजन आणि निवासस्थानी जाण्या-येण्यासाठीही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय महोत्सवात सहभागी होता यावे, यासाठी आयोजन समितीचे सदस्य सातत्याने लक्ष देत आहेत. नियोजनातील बारकावे, समन्वय आणि सांघिक कार्याच्या माध्यमातून विद्यापीठाने दिव्यांग विद्यार्थ्यांप्रती संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण केला आहे.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, कार्याध्यक्ष ॲड. अमोल पाटील, विद्यार्थी विकास समन्वयक समितीचे अध्यक्ष नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले यांच्यासह आयोजन समितीचे सर्व सदस्य कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत केला.

दिव्यांग महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांच्या फोटोसह प्रतिक्रिया..

१) 'युवारंगमध्ये आम्हाला घरच्यासारखी वागणूक मिळाली'

दिव्यांग महोत्सवातील सहभागी विद्यार्थी धनंजय पाटील यांनी विद्यापीठाच्या आयोजनाचे कौतुक केले. ते म्हणाले, "विद्यापीठातर्फे आयोजित दिव्यांग महोत्सवात आम्हाला घरच्यासारखी आपुलकी आणि वागणूक मिळाली. आयोजन समितीतील प्रत्येक सदस्याने मदतीसाठी पुढाकार घेतला आणि आम्हाला सर्वप्रथम प्राधान्य दिले. आतापर्यंत युवारंगमध्ये प्रामुख्याने गुणवंत विद्यार्थ्यांना संधी मिळत होती; मात्र विद्यापीठाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीही स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून दिले, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे."

२) 'दिव्यांग असल्याची जाणीवच होऊ दिली नाही'

सहभागी विद्यार्थिनी सुनंदा पावरा यांनीही आपला अनुभव व्यक्त केला. त्या म्हणाल्या, "युवारंग काय असतो किंवा दिव्यांग महोत्सव कसा असतो, याची मला पूर्वी माहिती नव्हती. युवारंगमध्ये सहभागी होण्याचे ठरविले, तेव्हा मनात थोडी भीती होती. मात्र येथे आल्यानंतर आयोजन समितीने ज्या पद्धतीने आपुलकीने वागणूक दिली, त्यामुळे माझी भीती दूर झाली. येथे एकाही क्षणी आम्ही दिव्यांग असल्याची जाणीव होऊ दिली नाही. प्रत्येकजण आम्हाला मदत करीत आहे. कला सादर करण्यासाठी प्रथम प्राधान्य मिळत आहे. प्रत्येक सभागृहात विशेष व्यवस्था, भोजनाची सुविधा तसेच निवासस्थानी

जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे आमच्यासारख्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने दरवर्षी अशा कला महोत्सवांचे आयोजन करावे," अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

३) दिव्यांग विद्यार्थ्यांतून भविष्यात उत्तम कलावंत घडतील'

दिव्यांग महोत्सव समितीचे सचिव प्रा. डॉ. सुनील नेवे यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र दिव्यांग महोत्सव सुरू करणे ही स्वागतार्ह बाब आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून त्यांना आपले कलाप्रकार सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. दरवर्षी या महोत्सवात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. एखादा दिव्यांग विद्यार्थी जेव्हा आपली कला सर्वांसमोर सादर करतो, तेव्हा दिव्यांग महोत्सव आयोजित करण्यामागचा उद्देश सफल झाल्याचा आनंद मिळतो. निश्चितच या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थी विविध कलाप्रकारांतून आपले कौशल्य सिद्ध करतील आणि भविष्यात त्यांच्यातून उत्तम कलावंत घडतील."

संधी, प्रोत्साहन आणि समानतेचा संदेश

युवारंग २०२६ मधील दिव्यांग कला महोत्सव हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न राहता दिव्यांग विद्यार्थ्यांना समान संधी, सन्मान आणि आत्मविश्वास देणारा उपक्रम ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्याबरोबरच त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणारे विद्यापीठाचे नियोजन विशेष कौतुकास्पद ठरत आहे. 'समता ते समरसता' या युवारंगच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित करणारा हा महोत्सव ठरत आहे.

आज होणार पारितोषिक वितरण आणि समारोप सोहळा

रंगमंच क्रमांक १ महात्मा फुले सभागृहात दि.३१ रोजी सकाळी १० वाजता पारितोषिक वितरण आणि समारोप समारंभ होणार आहे. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयांचा यावेळी गौरव करण्यात येईल. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी हे उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून हास्यजत्रा फेम हेमंत पाटील उपस्थित राहणार आहेत. प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे,व्यवस्थापन परिषद सदस्य तथा स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे,युवारंगचे कार्याध्यक्षॲड.अमोल पाटील,विद्यार्थी विकास समन्वय समिती अध्यक्ष नितीन झाल्टे,कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्यासह विविध प्राधिकरणाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ३० ऑक्टोबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता